छत्रपती संभाजीनगर । बीड । परभणी । लातूर । धाराशिव । नांदेड येथून एकाच वेळी प्रकाशित होणार दैनिक

दैनिक
बीड, छत्रपती संभाजीनगर,लातूर, धाराशिव, परभणी, जालना,नांदेड
मराठवाड्याचे प्रत्येक घडामोडीचे दर्पण

# मराठवाडा दर्शन

Mo.9028349999
E-Mail : marathwadadarshannews@gmail.com
MARATHWADA DARSHAN
संपादक : दत्तात्रय बालासाहेब हंडीबाग

प्रतिनिधी पाहिजेत
" दैनिक मराठवाडा दर्शनसाठी "
मराठवाड्यातील सर्व जिल्हे
तालुका, गावस्तरावर
प्रतिनिधी नेमणे आहेत.
:: संपर्क ::
MO.9028349999

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -२९५ | बुधवार दि.०९ जुलै २०२५ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७७८५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | DAILY | MARATHI | Year-02 | Issue -295 | WEDNESDAY DT.09 JULY 2025 | RNI : MAHMAR/2023/87785 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# अंबाजोगाईत अवैध खाजगी सावकारी तेजीत

## सावकारांचा सुळसुळाट, गरजवंताचे अर्थिक शोषण,प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष

### व्याजाच्या बोजात बुडालेली आयुष्यं

अनेक जण सुरुवातीला थोड्याच रकमेसाठी कर्ज घेतात, पण वाढत्या व्याजासह परतफेड करणे शक्य न झाल्याने त्यांची संपूर्ण मालमत्ता विकावी लागते. काही प्रकरणात तीन महिन्यात दामदुप्पट होते. ठरलेल्या वेळेत पैसे आले नाहीत तर सावकाराकडून जमीन, शेती स्वतःच्या नावावर करून घेतली जाते. व्याजात बुडालेल्या अनेक कर्जदारांनी शेतजमीन, प्लॉट, घरे गमावली आहेत. काही जणांना तर गाव सोडावे लागले असून, कर्जबाजारीपणामुळे आत्महत्येच्या घटना देखील घडत असल्याच्या तक्रारी आहेत.

### भिशीमार्फतही चालते सावकारी

मंडळे, काही बचतगट, मित्रांचे ग्रूप यांच्यामार्फत भिशी चालवली जाते. त्यापैकी काही भिशींतून आठवड्यावर पैसे दिले जातात. त्याची आकारणी १५ ते २५ टक्के असल्याचे बोलले जाते. एखाद्या आठवड्यात हप्ता चुकला तर चक्रवाढ व्याज लावण्यात येते.

### प्रशासनाचे दुर्लक्ष?

सावकारांकडून कोणतीही नोंदणी, परवाना किंवा आर्थिक व्यवहारांची माहिती शासनाला दिली जात नाही. पोलिस व महसूल प्रशासनाकडेही यावर ठोस कारवाईची मागणी वारंवार होत असूनही, आजतागायत ठोस पावले उचललेली दिसून येत नाहीत. अवैध सावकारी ही केवळ एक आर्थिक बाब नसून, ती समाजातील गरीब व मध्यमवर्गीयांचे जीवन उद्ध्वस्त करणारी एक गंभीर समस्या बनली आहे. प्रशासनाचे दुर्लक्ष, राजकीय अभय यामुळे बिनधास्तपणे सावकारांचे नेटवर्क विस्तारत आहे. प्रशासनाने अशा अवैध सावकारी विरोधात मोहीम राबवावी आणि सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

अंबाजोगाई(प्रतिनिधी)

सावकारी पाशात अडकलेल्या व्यापाऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी बीड शहरात घडली. यानिमित्ताने जिल्हा व तालुकभर वाढलेल्या अवैध सावकारीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अंबाजोगाई देखील आता सावकारांचे शहर म्हणून पुढे येत आहे. अंबाजोगाई शहरात अवैध खाजगी सावकारांचा सुळसुळाट झाला असून, कोणताही कायदेशीर परवाना किंवा सरकारी नोंद न करता हे सावकार गल्लोगल्ली 'कर्जपुरवठादार' बनून गरजवंतांचे आर्थिक शोषण करत आहेत.कमी भांडवलात भरमसाठ रक्कम उकळता येत असल्याने अवैधरित्या सावकारी करणाऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. दरमहा ५ ते ३० टक्क्यांपर्यंत व्याजाची वसुली करून कर्जदारांना भिकारी करण्याचा उद्योग जोमात सुरू आहे. या लुटमारीतून मिळालेल्या पैशातून गळ्यात सोनसाखळी, हातात सोन्याचे कडे अशा थाटात फिरणाऱ्यांनी फ्लॅट, शेती, बंगले, गाडी अशा अनेक ठिकाणी संपत्तीची गुंतवणूक केली आहे. काहीही कामधंदा करोडपती होण्याच्या या शॉर्टकटची तरुणाईला भुरळ पडत आहे. त्यामुळे शहराच्या गल्लीबोळातून नवनवीन सावकार उदयास येत आहेत.

अद्यापही पतसंस्था, बँका यातून कर्ज मिळण्याची प्रक्रिया किचकट आहे. या संस्था कर्ज देताना पगाराची स्लिप अथवा आयटी रिटर्न भरलेली कागदपत्रे असल्याशिवाय रक्कम मंजूर करत नाहीत. बहुसंख्य सामान्य लोकांकडे या दोन्ही गोष्टी नसतात. त्यामुळे महागाई, बेरोजगारी, आरोग्यखर्च, शैक्षणिक गरजा यामुळे अनेक सामान्य नागरिक, महिला, रिक्षाचालक, लहान-मोठे व्यावसायिक व शेतकरी हे तातडीच्या पैशासाठी खाजगी सावकारांकडे धाव घेतात. याचा गैरफायदा घेत सावकार कोणतेही कायदेशीर दस्तऐवज न करता, त्यांच्याकडून चेक, आधारकार्ड, बँक पासबुक, मालमत्तेची कागदपत्रं घेतात आणि भरमसाठ व्याजाच्या बोलीवर कर्ज देतात.

हप्ते थकले की धमक्या,

हप्त्यांच्या परतफेडीला थोडासा उशीर झाला, तर हे सावकार गुंडांना सोबत घेऊन दरवाज्यावर येतात. कर्जाच्या वसुलीसाठी संबंधित कुटुंबाच्या घरी जाऊन धमक्या दिल्या जातात. अनेकांना सार्वजनिक ठिकाणी अपमानित केले जाते. शिवीगाळ, मारहाण, आणि ब्लँक चेकद्वारे फसवणूक करून आणखी पैसे उकळले जातात. ही एक प्रकारची आर्थिक गुन्हेगारी असून, तिच्यावर कोणताही कायदेशीर अंकुश नाही.

# केज तालुक्यात अत्याचारांच्या घटनांची मालिका सुरूच!

## अल्पवयीन शाळकरी मुलीचा विनयभंग!




केज/प्रतिनिधी

केज तालुक्यात स्त्री अत्याचाराच्या घटना थांबायचे नाव घेत नसून पुन्हा एकदा एका शाळकरी अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिचा विनयभंग केल्याची घटना उघड झाली असून सदरील घटनेचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या बाबत अधिक माहिती अशी की दिनांक ८ जुलै रोजी सकाळी ९:४५ वाजण्याच्या सुमारास पीडित अल्पवयीन मुलगी ही शाळेत जात असताना ऋषिकेश उर्फ सचिन गलांडे याने तिचा पाठलाग केला. आणि ट्रॅक्टर घेऊन तिच्या पाठीमागून जात तिला कट मारून पुढे गेला. तिच्याकडे पाहून हावभाव करून विनयभंग केला. या प्रकरणी अल्पवयीन मुलीच्या तक्रारीवरून ऋषिकेश उर्फ सचिन गलांडे याच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला असून पिंक पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके हे पुढील तपास करीत आहेत.एक वर्षापासून पिडिता सहन करीत होती त्रास!

ऋषिकेश उर्फ सचिन गलांडे हा पीडित मुलगी नववीच्या वर्गात शिक्षण घेत असल्यापासून तिचा पाठलाग करून स्कूल बॅग धरून ओढणे व तिच्या हाताला धरून ओढणे कट मारून निघून जाणे. तसेच दहावीची परीक्षा देऊ देणार नाही याबाबत कोणाला सांगितलेस तर तुला खल्लास करून टाकतो. अशी धमकी देत होता.

शिक्षक आणि आई-वडिलांना कल्पना देऊनही त्रास देणे थांबले नाही

पीडित मुलींनी ऋषिकेश उर्फ सचिन याच्या पासून तिला होणाऱ्या त्रासाची कल्पना तिच्या आईला दिल्यावरून त्यांनी त्याच्या घरी जाऊन त्याच्या आई-वडिलांना त्याला समजावून सांगणे बाबत सांगितले होते. तसेच पीडित मुलीने मुख्याध्यापक आणि शिक्षकांना पण या छेडछाडीची कल्पना दिली होती. तरी तो तिला त्रास देत असे.

### एकाच आठवड्यात केज तालुक्यात स्त्री अत्याचाराच्या चार घटना!

१) दि. २ जुलै रोजी एका गतिमंद तरुणीवर नानासाहेब चौरे याने गोठ्यात लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली होती.२) दि.४ जुलै रोजी दुपारी तीन ३:००वाजण्याच्या सुमारास एका दिव्यांग आणि गतिमंद असलेली तरुणी ही घरात एकटीच असताना बाळू कांबळे यांनी तिचा विनयभंग केला होता.३) दि ४ जुलै रोजी निखिल कांबळे यांनी नववीच्या वर्गात शिकत असलेल्या अल्पवयीन मुलीचा मोटरसायकल वरून पाठलाग करीत तिचा विनयभंग केला.४) दि. ७ जुलै रोजी ऋषिकेश उर्फ सचिन गलांडे यांनी १०वीच्या वर्गात शिकत असलेल्या अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिचा विनयभंग करून परीक्षेला न बसू देण्याची व जीवे मारण्याची धमकी दिली.

# केज तालुक्यातील भाटुंबा येथील शेतकऱ्याने घेतले स्वतःच्या खांद्यावर जू



केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील भाटुंबा येथील अल्प भूधारक शेती असलेल्या शेतकऱ्यांची व्याथा ,बैल बारदाना सांभाळणे परवडत नाही आणि शेती त्या शिवाय कसता येता नाही. तसेच नांगरणी, पेरणी जरी ट्रॅक्टरने केली; तरी एवढ्या छोट्या जमिनीच्या तुकड्यात पेरणी केल्या नंतर मग आंतरमशागत कशी करावी? म्हणून केज तालुक्यातील भाटुंबा येथील एका शेतकऱ्याने चक्क कोळप्याचे जू आपल्या खांद्यावर घेत कारभारणीच्या मदतीने गेल्या सहा वर्षांपासून कोळपणी करतात.

केज तालुक्यातील भाटुंबा येथील छोट्या गावात राहत असलेले शेतकरी नामदेव मोरे यांना भाटुंबा येथे दोन एकर जमीन आहे. ती थोडी जमीन आणि लोकांच्या शेतात मोलमजुरी करून त्यांचे कुटुंब गुजरान करीत आहेत.आता पूर्वी सारखे बैल-बारदाना ठेवणे अल्पभूधारक शेतकऱ्यांना परवडत नाही. म्हणून नामदेव मोरे हे त्यांची जमीन ही ट्रॅक्टरने नांगरणी, पाळी, पेरणी करून घरीच कसत आहेत. मात्र नांगरणी, पाळी, पेरणी जरी ट्रॅक्टरने करता येत असली. तरी छोट्या शेतकऱ्यांना पिकातील आंतरमशागत करण्यासाठी मजूरही लवकर मिळत नाहीत आणि ज्यांच्याकडे बैल व वखर असलेले मजुरी काम करणारे देखील उपलब्ध होत नाहीत.

मग सोन्यासारखे पिक आलेले असताना त्याची जर व्यवस्थित आणि वेळ-वर आंतरमशागत केली नाही तर त्याचा काही उपयोग होत नाही. म्हणून नामदेव मोरे यांनी त्यांची अर्धांगिनी अंजना यांच्या मदतीने सोयाबीनची कोळपणी आणि वखरणी करण्यासाठी चक्क कोळप्याचे जू स्वतःच्या खांद्यावर घेऊन ढोर मेहनत करत आहेत.

तर कोळप्याचा कासरा आणि येसकी पत्नीच्या हातात दिली. जे कोळप्याचे जू बैलाच्या खांद्यावर असते ते जू मालकाच्या खांद्यावर बघून आणि ते ओढीत असताना काळीज आणि जीव पिळवटून जात आहे. पण मेहनत केल्याशिवाय पीक कसे येईल असा विचार करून मन घट्ट करून मी हातात कासरा घेऊन कोळपणी सुरू केली अशी प्रतिक्रिया अंजना मोरे यांनी व्यक्त केली.

## वादळी वाऱ्याने शेतकऱ्याच्या सोलार पॅनलचे नुकसान

# पहुरी येथील घटना

सोयगाव । प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील मौजे पहुरी शिवारातील गट क्र. १२२ मधील शेतकरी शिवाजी दिगंबर गव्हाले यांच्या शेतातील बसविण्यात आलेल्या सोलारचे पॅनल( दि.२९)रोजी झालेल्या वादळी वाऱ्याने एक पॅनल पूर्णपणे फुटल्याने - शेतकऱ्याचे खूप नुकसान झाले असून कंपनी कडून नुकसान भरपाई मिळण्याची अपेक्षा शेतकऱ्याकडून व्यक्त करण्यात आली आहे.या प्रकरणी संबंधित शेतकरी यांनी सोयगाव तहसील कार्यालयात नुकसानीची तक्रार केली आहे दरम्यान या



सोलर पॅनेलचे नुकसानीमुळे शेतकऱ्यांची कामे ठप्प झाली आहे.

## पांगरबावडी येथील मसणजोगी वस्ती येथे

# २०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

बीड/प्रतिनिधी

दिनांक ८ जुलै२०२५ रोजी धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड व कोरो इंडिया ग्रासरूट नेतृत्व संस्था विकास कार्यक्रम अंतर्गत पांगरबावडी येथील मसणजोगी वस्ती येथे राष्ट्रीय शिक्षण धोरण, शालेय साहित्य वाटप, आरोग्य व नागरिकतत्व पुरावे एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली प्रियंका खोब्रागडे मुख्य कार्यकारी अधिकारी धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.



मसणजोगी समाज भटक्या जमातीतील आहे,मसनजोगी समाजातील महिला, शालेय मूल, मुली, निराधार महिला यांनी आपल्या पाल्यांना शिकवावे , त्यांचे जन्माचे कागदपत्र ,, आधार कार्ड, मतदान कार्ड, राशन कार्ड, जातीचे प्रमाणपत्र व शाळा बाहेरील मूल व शाळेतील मुलांचा आज २०० मुल व मुली यांना वही, पेन, पुस्तक वाटप करून आज कार्यशाळा साजरी केली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राजू वंजारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त, तसेच अभिजित वैद्य जिव्हाळा केंद्र बीड चे संचालक, विलास मगरे कोरो इंडिया मराठवाडा, अनिता वाघमारे राजकीय व सामाजिक कार्यकर्ते बीड या उपस्थित होत्या. सोबत शाहीन पठाण सामाजिक कार्यकर्ते गेवराई,शालेय शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, गट सदस्य, गट मधील महिला, पुरुष उपस्थित होते ५०टक्के मुलांना धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड यांच्या वतीने शाळेत प्रवेश मिळाला आहे, त्यांचे सर्व आवश्यक कागदपत्र मिळून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, जिल्हाधिकारी बीड, तहसीलदार बीड यांना निवेदन देऊन एक दिवसीय कॅम्प घेण्यात आला व जास्ती जास्त मसणजोगी समाज मधील सर्व समाजाचे कागदपत्र मिळून देण्यास प्रयत्न करत आहेत, कृष्ण संकोड, दीपक शेनूरे, सुनील उबदे, सखाराम संकोड, विजय पस्तमोड व अन्य सोबत गट मधील कार्यकर्त होते.

धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड चे संस्था फेलो अशोक गायकवाड, प्रियंका वाघमारे, निकिता जाधव, कोमल यादव, महेंद्र जाधव, रूपाली खोले, अंबिका कुटे, आरती कोरडे, प्रेमकुमार कोकाटे, महेंद्र जाधव,अन्य संस्था कार्यकर्ते व कर्मचारी महिला व मुल तसेच मुली उपस्थित होते. व शिक्षण , आरोग्य, व शालेय साहित्य वाटप करण्यात आले व एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली.



# संकल्प विद्या मंदिर शाळेत अवतरले साक्षात विठू- रुखूमाई

## संकल्प विद्या मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी सांप्रदायिक गीतामधून दिला सामाजिक संदेश
## संकल्प विद्या मंदिराचे काम संकल्प नावा प्रमाणेच- ह.भ.प. महारुद्र महाराज खाडे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील संकल्प विद्या मंदिर शाळेमध्ये आषाढी एकादशीनिमित्त पालखी सोहळा आयोजित करण्यात आला यावेळी प्रशालेतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणी ,संत तुकाराम ,संत ज्ञानेश्वर ,संत एकनाथ संत जनाबाई, आणि वारकरी यांच्या वेशभूषा केल्या होत्या. शिवगड संस्थाचे महंत श्री ह.भ.प. महारुद्र महाराज खाडे तसेच पालक सौ. नेहा-श्री सुरज बाबुराव मस्के, सौ. वैष्णवी - श्री दिनेश मारुती गडदे, यांच्या हस्ते विठ्ठलाची आरती करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुण्यांचा शाळेच्या वतीने विठ्ठलाची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला.महंत महारुद्र महाराज खाडे यांनी आशीर्वाद पर मार्गदर्शनामध्ये संकल्प विद्यामंदिर शाळेचे काम हे त्यांच्या नावाप्रमाणेच आहे. तसेच सर्वांना आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या.

पालखीचे पूजन करून पालखीने शालेय परिसरातून मार्गक्रमण केले. पालखी सोहळ्यामध्ये सुंदर देखाव्याने पाणी आडवा पाणी जिरवा तसेच सामाजिक संदेशाने परिसरातील सर्व नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. चिमुकल्या वारकऱ्यांनी ग्यानबा तुकाराम जय जय राम कृष्ण हरी माऊली माऊलीच्या नाम घोष यावेळी केला. या बाल वारकऱ्यांनी गोल रिंगण केले यावेळी रिंगणात फुगड्या खेळाचा आनंद चिमुकल्याने घेतला. भारुड, तसेच वेगवेगळ्या गीतावर विद्यार्थ्यांनी विद्यार्थिनींनी उत्कृष्ट सादरीकरण केले.बन्सीलाल नगर अंबाजोगाई येथील जागृत हनुमान व विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे दिंडीचा समारोप करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी मनसोक्त भोजनाचा आनंद घेतला. मुख्याध्यापिका श्रीमती बडे आर. एस. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्राथमिक विभाग श्रीमती घाडगे पी. व्ही., माध्यमिक विभाग श्रीमती कुलकर्णी ए. व्ही., यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# डॉक्टर मधील माणुसकी:अपघातातील महिलेस स्वत:च्या कार मधून रुग्णालयात केले दाखल

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

मोटार सायकल अपघातात महिला जखमी झाली. फोन करूनही रुग्णवाहिका येईना.आली तर तिच्यातले डिझेल संपलेले. अशा स्थितीत कसलाही विचार न करता सामाजिक कार्यकर्ते डॉ.रमेश भराटे यांनी जखमी महिलेस कार मध्ये घेऊन थेट अंबाजोगाईचे रुग्णालय गाठले.

जखमी महिलेवर उपचार करण्यासाठी मदतही करून माणुसकीचे दर्शन घडवले. मंगळवारी सकाळी लातूरहून अंबाजोगाईकडे दुचाकीवरून जात असताना राधिका हालगुंटे वय ३० वर्षे.या मोटारसायकल अपघातात जखमी झाल्या. यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. रस्त्याच्या कडेला पती व पत्नी गंभीर अवस्थेत होते.येणारे जाणारे सर्व प्रवासी पाहत होते. परंतु मदती साठी कोणी ही पुढे येत नव्हते.त्याच दरम्यान लातूरहून अंबाजोगाई कडे प्रसिद्ध छातीविकार तज्ञ डॉ रमेश भराटे हे येत होते. त्यांनी हे सर्व पाहिले व उपचारासाठी त्वरित रुग्णालयात हलवण्या साठी प्रयत्न केले. त्यांच्या सोबत केज येथील बांधकाम व्यावसायिक श् विलास थोरात हे होते. बराच वेळ वाट पाहून टोल नाक्यावर असलेली रुग्णवाहिका आली. परंतु त्यांनी मधे डीज़ल नसल्याचे सांगितले.अत्यावश्यक सेवेतील वाहनात डीझेल नसणे ही बाब अत्यंत दुर्दैवी आहे.थोडा ही वेळ न घालवतां डॉ रमेश भराटे व विलास थोरात यांनी त्वरित राधिका हालगुंटे व पती यांना स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करून संबधितास उपचार त्वरित सुरू करण्यासाठी मदत केली

रुग्णवाहिके बाबत सततच्या तक्रारी:

अंबाजोगाई - लातूर रोड वर अपघाताचे सत्र कायम सुरूच आहे. अपघातातील जखमी व्यक्तींसाठी सेलू टोलनाका येथे एक रुग्णवाहिका उपलब्ध आहे. मात्र ही रुग्णवाहिका घटनास्थळी कधीच वेळेवर येत नाल्याच्या तक्रार परिसरातील नागरिकांची आहे. आज तर रुग्णवाहिका आली.मात्र त्या गाडीत डिझेलच् नाही. अशी विपरीत स्थिती



निर्दशनास आली.

## रोटरीने माळरानावर केली १३० वृक्षांची लागवड
## एक पेड मां के नाम घोषणा देत विद्यार्थ्यांनी केले वृक्षारोपण

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

एक पेड मां के नाम च्या घोषणा देत विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण केले. शाळेच्या माळरानावर रोटरीने १३० वृक्षांची लागवड करत, या वर्षी दोन हजार वृक्षांची लागवड व संगोपन करण्याचा संकल्प केला.

रोटरी क्लब अंबाजोगाई सिटीच्या वतीने शहरातील मुकुंदराज विद्यालय , लालनगर,क्रांतीनगर परिसरात असणाऱ्या उघड्या खडकाळ डोंगर भागात, स्मशान भूमीजवळ , शालेय विद्यार्थ्यां समवेत वृक्षारोपण करण्यात आले. एक पेड मां के नाम या घोषणा देत वृक्षारोपण केले. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी लावलेल्या वृक्षांना दररोज एक बाटली पाणी देण्याचे कबूल करीत झाडांची देखभाल करण्याचे वचन दिले.पर्यावरण




पूरक हरित भविष्याचे प्रकल्पाची या उपक्रमाच्या माध्यमातून सुरुवात झाली .

या उपक्रमाचे प्रकल्प संचालक राजेंद्र घोडके यांनी या वर्षभरात दोन हजार वृक्षांची लागवड व संगोपन करण्याचा संकल्प केला. यावेळी रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा रोहिणी पाठक,सचिव मंजुषा जोशी,प्रकल्प संचालक राजेंद्र घोडके,सह संचालक गोरख मुंडे,कल्याण काळे,धनराज सोळंकी,जगदीश जाजू,अरुण आसरडोहकर, प्रवीण चौकडा,भीमाशंकर शिंदे, अभिषेक मुंदडा,शाळेच्या मुख्याध्यापिका धायगुडे, जगन सरवदे यांच्यासह रोटरीचे सदस्य,लालनगर,क्रांतीनगर परिसरातील रहिवासी उपस्थित होते.

# आषाढीच्या मुहूर्तावर केजमध्ये सापडले आयशरभरुन मुंडके, हाडांचे सांगाडे



## बीडचे गोहत्या व गोतस्करीचे जाळे मुंबई-पुण्यापर्यंत पसरलेले - प्रशांत डोरले, किशन चौहाण

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात गोवंशाचे कत्तल होण्याचे प्रमाण वाढले असून, चोरट्या पद्धतीने गाय, बैल, कालवड, म्हैस सारख्या प्राण्यांची वाहतूक करून निर्मनुष्य ठिकाणी ही कत्तल करून गोमाता व गोवंशाचे सापळे, शिर, कातडी, हाडे, कातडी, सांगाडे इ. सह अन्य गोष्टी पुरावा सापडू नये म्हणुन नष्ट करण्याच्या उद्देशाने बीड शहराच्या सोबतच अन्य ग्रामीण परिसरात तसेच निर्मनुष्य भागात नेऊन विल्हेवाट लावण्याच्या उद्देशाने पुरण्यात येत आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वीच बीड शहराच्या जवळ असलेल्या गोरे वस्ती, बांगरनाला परिसरात असेच २५ते३० गोवंशाची हत्या केलेली आढळून आलेली होती, यातील आरोपी निष्पन्न होऊन अटक होण्याच्या आधीच केज तालुक्यात दुसरी घटना घडल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर संशय निर्माण होत आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, कालपरवा हिंदू धर्माच्या दृष्टीने पवित्र असलेल्या आषाढी एकादशीच्या दिवशी पहाटे दिनांक ०६ जुलै २०२५ बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील विडा ते शेंडी मार्गावर कारेगाव या ठिकाणी एक आयशर (ट्रक) भरून गोवंशाचे मुंडके हाडे जात असल्याची माहिती गोरक्षक केशव रत्नपारखे व अन्य यांना मिळताच तातडीने डायल ११२ वर कॉल करून माहिती देत गोरक्षकांनी ही गाडी अडवली असता यात अंदाजे ४००- ५०० गाय, बैल, म्हैस, कालवड यांच्या कत्तल केल्याली असल्याचे प्राथमिक दिसून आले, प्रकरणाचे गांभीर्य ओळखत केज पोलिस स्टेशनचे पीआय उनवने साहेब यांच्या पथकाने तातडीने या ठिकाणी धाव घेत प्रकरणाची खातरजमा केली असता एक विटकरी रंगाचा आयशर टॅम्पो पासिंग क्रमांक चक१२कऊ३३४८ हा रोडच्या बाजूला ऊभा होता. त्याची पोलिसांनी तपासणी केली असता त्यामध्ये अवैधरित्या गायी, म्हसी व बैल यांचे हाडांचे सांगाडे, मुंडक्याच्या कवट्या, पायांचे सांगाडे मांस व हाडे असे भरलेले मिळून आले. सदर गाडी चालक नाव अकबर ईस्माईल टकारी वय ४५ वर्ष रा. रसुलपुरा ता. जि. धाराशिव व गाडी मालक अमीर ईस्माईल पठाण रा. रसुलपुरा धाराशिव याची गाडी असल्याचे सांगीतले. चालकाने सांगितले की, सदर माल हा धाराशिव येथुन तौफीक भाई खुरेशी रा. ख्वाजा नगर धाराशिव यांचेकडुन भरलेला आहे व नेकनुरचा अतिक रा. नेकनुर ता. बीड याच्याकडे माल घेऊन जात असल्याचे कबूल केले आहे सदर मालाची तपासणी पशु वैद्यकीय अधिकारी व पशुडॉक्टर यांनी पाहणी केली असता ५ टन वजनाचे गायी, म्हसी व बैल यांचे हाडांचे सांगाडे, मुंडक्याच्या कवट्या, पायांचे सांगाडे व मांस व हाडे असे एकूण ८,००,०००/-रु चा मुददेमाल मिळून आलेला आहे.

यात केज पोलिसांनी दिलेल्या फिर्यादीनुसार १)अकबर ईस्माईल टकारी, वय ४५ वर्ष, २) अमीर ईस्माईल पठाण, दोन्ही रा. रसुलपुरा ता. जि. धाराशिव ३). तौफीक भाई खुरेशी रा. ख्वाजा नगर धाराशिव ४).

# पाटोदा तालुक्यातील बसथांब्यांवर निवारा शेड नसल्याने प्रवाशांचे हाल

## तात्काळ बसथांब्यावर निवारा शेड उभारा सावता सेनेच्या स्वाती कातखडे यांची मागणी

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा शहरातील पारगाव चौक,राज मोहम्मद चौक,तसेच तालुक्यातील चुंबळी फाटा,वाजरा फाटा आदी ठिकाणी असलेल्या बसथांब्यांवर निवारा शेड नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शाळकरी विद्यार्थी, वयोवृद्ध नागरिक व महिलांना उन्हा-पावसात थांबावे लागत असल्याने त्यांचे हाल सुरू आहेत.या समस्येबाबत सावता सेनेच्या बीड जिल्हाध्यक्षा सौ. स्वाती कातखडे



यांनी आवाज उठवला असुन त्यांनी स्पष्ट शब्दांत प्रशासनाला मागणी केली की, पाटोदा शहर व तालुक्यातील सर्व बसथांब्यांवर तातडीने निवारा शेड उभारण्यात यावेत. नागरिकांच्या मूलभूत सोयीसुविधांकडे दुर्लक्ष होणे, हे शासनाच्या जबाबदारी पासून पळ काढणे आहे.

स्वाती कातखडे यांनी यापूर्वीही सामाजिक प्रश्नांवर ठाम भूमिका घेतली असून, जनतेच्या अडचणी सोडवण्यासाठी त्या कायम कार्यरत आहेत. यावेळी त्यांनी इशारा दिला की, जर लवकरात लवकर पाटोदा तालुक्यातील बस थांब्यावर निवारा शेड उभारण्यात आले नाहीत, तर सावता सेना रस्त्यावर उतरेल आणि तीव्र आंदोलन छेडेल.असा इशाराही सावता सेनेच्या महिला बीड जिल्हा अध्यक्ष स्वातीताई कातखडे यांनी दिला असुन गावा गावांतील बसथांब्यांवर बसण्यासाठी बाक व निवारा शेडचा अभाव असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. या सगळ्या समस्या ग्रामीण भागातील प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी गंभीर धोका ठरू शकतात, असेही त्या म्हणाल्या.या मागणीची दखल घेऊन प्रशासन काय पावले उचलते, याकडे तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.



आष्टी (प्रतिनिधी)

चांगले काम करणाऱ्यांवर, चांगले वागणाऱ्यांवर नेहमीच शुभेच्छांचा वर्षाव होतो. त्यासाठी वाढदिवस हेही एक निमित्त असते. सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व कोणतेही क्षेत्र असो व सामाजिक कार्य असो हिरारीने भाग घेणारे सर्वांचे लाडके मनमिळावू स्वभावाचे व मोठा मित्र परिवार जोडलाच नव्हे तर मैत्री निभावणारे, कायम मित्रांच्या सुख - दुःख सामील होणारे व सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जाणारे भैरवनाथ उद्योग समुहाचे सर्वेसर्वा ईश्वर बंडु राऊत व राजेंद्र राख यांचा वाढदिवस शनिवार दि. ५ जुलै २०२५ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

# बापू शिंदे यांचे नवी दिल्ली येथे बीएलओ चे राष्ट्रीय प्रशिक्षण संपन्न

आष्टी (प्रतिनिधी)

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, झारखंड व लडाख या राज्यातील मतदान नोंदणी अधिकारी (बी.एल.ओ.) व पर्यवेक्षक यांच्या करीता आय. आय. आय. डी. ई. एम. नवी दिल्ली येथे आयोजित विशेष प्रशिक्षण दिनांक ३ व ४ जुलै २०२५ रोजी भारत निवडणूक आयोगाच्या, भारत आंतरराष्ट्रीय लोकशाही व निवडणूक व्यवस्थापन संस्था नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणाकरिता राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय महाराष्ट्र राज्याच्या कार्यालयाने नामनिर्देशित केलेले २ जिल्हा निवडणूक अधिकारी, ११ मतदान नोंदणी पर्यवेक्षक व १४४ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी सहभाग नोंदवून मतदान नोंदणी व निवडणूक विषयक कार्य प्रशिक्षण पूर्ण केले. यामध्ये २३१ आष्टी विधानसभा मतदार संघाच्या वतीने पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आष्टा हरिणारायण शाळेचे आदर्श शिक्षक तथा स्काऊट मास्टर बी. एल. ओ बापू शिंदे यांनी सक्रिय सहभाग नोंदवून प्रशिक्षण पूर्ण केले. याप्रसंगी भारताचे माननीय मुख्य निवडणूक आयूक्त ज्ञानेश कुमार साहेब यांनी सर्वांना मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र राज्याचे सहाय्यक निवडणूक अधिकारी किरण शार्दुल साहेब यांच्या हस्ते आष्टा भाग क्र. २३२ तालुका आष्टी चे बी. एल. ओ. बापू शिंदे यांना प्रशिक्षण योग्यरित्या पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले, याकरिता भारत निवडणूक आयोगाने निर्देशित केलेले नॅशनल लेवल राष्ट्रीय ट्रेनर तथा उपजिल्हाधिकारी मूर्तिजापूर संदीपकुमार अपार साहेब, उपजिल्हाधिकारी तथा राज्याचे सहाय्यक निवडणूक अधिकारी शार्दूल शेवाळे साहेब, उपजिल्हाधिकारी वणीचे नितीन इंगोले साहेब यांनी राज्यातील सर्व बूथ लेवल मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षक यांना प्रशिक्षित केले. बापू शिंदे यांनी दिल्ली येथे प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल आष्टीचे आ. सुरेश आण्णा धस,ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोरंजन धस, आष्टीच्या तहसीलदार वैशाली पाटील मॅडम, निवासी नायब तहसीलदार प्रकाश शिरसवाड, महसूल सहाय्यक अधिकारी शिवप्रसाद गारोळे, ऑपरेटर विशाल मोकाशी, आष्टा गटाचे माजी जिल्हा परिषद




सदस्य अमर राजे निंबाळकर, सरपंच गणेश माळवे, उपसरपंच वैभव पठाडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय पठाडे, पतसंस्थेचे चेअरमन मारुती पठाडे, उपाध्यक्ष अशोक लटपटे, सचिव महेश शिंदे, आष्टा शाळेचे मुख्याध्यापक रघुनाथ मुटकुळे, मच्छिंद्रनाथ जगताप, नामदेव भिसे, श्रीरंग खोकले, केंद्रप्रमुख धर्मराज शिंदे, मधुकर धुमाळ, सुभाष बांगर, राजेंद्र भागवत, उमेश झांबरे, सोमनाथ वाळके, तुषार पवार, श्रीमती द्रौपदी गवळी, सुषमा जाधव इत्यादींनी बापू शिंदे यांचे अभिनंदन केले.

## महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचा तुघलकी निर्णय

# इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अंबाजोगाई शाखेनं केलं आंदोलन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

इंडियन मेडिकल असोसिएशन अंबाजोगाई शाखेने महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने ३० जून २०२५ रोजी जारी केलेल्या वादग्रस्त अधिसूचनेचा तीव्र निषेध नोंदवला आहे. या अधिसूचनेनुसार, केवळ एका वर्षाचा ब्रिज कोर्स पूर्ण केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरांना अलोपॅथीची प्रॅक्टिस करण्याच्या परवानगी सोबतच महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या नोंदणी पुस्तकामध्ये नोंदणीची परवानगी देण्यात आली आहे. इंडिअन मेडिकल असोसिएशनच्या मते, हा निर्णय संपूर्ण आधुनिक वैद्यकीय शिक्षणव्यवस्थेचा व नैतिकतेचा अवमान करणारा असून रूग्णांच्या आरोग्याशी गंभीर धोका निर्माण करणारा आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवार, दिनांक ८ जुलै २०२५ रोजी आय.एम.ए.अंबाजोगाई शाखेच्या वतीने उपजिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले.

या शिष्टमंडळात इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, अंबाजोगाई शाखेचे डॉ.नवनाथ घुगे-अध्यक्ष, डॉ.उद्धव शिंदे -सचिव, डॉ.राहुल धाकडे - उपाध्यक्ष, डॉ.विजय लाड - उपाध्यक्ष, डॉ.निलेश तोष्णिवाल -



सहसचिव, डॉ.अतुल शिंदे - सहसचिव, डॉ.बळीराम मुंडे - सह कोषाध्यक्ष, डॉ.सुनिल जाधव - संस्कृतिक सचिव, डॉ.शिवराज पेस्टे - क्रीडासचिव, डॉ.संदिप जोगदंड - क्रीडा सहसचिव, डॉ.अनिल भूतडा, डॉ.सचिन पोतदार, डॉ.विवेक मुळे, डॉ.नागोराव डेरनासे यांची प्रमुख उपस्थिती होती. इंडियन मेडिकल असोसिएशन अंबाजोगाई शाखेने यावेळी नागरिकांमध्ये या निर्णयामुळे सामाजिक आरोग्य धोक्यात कसे येईल याविषयी जनजागृती केली. यामध्ये या अधिसूचनेचे दुष्परिणाम स्पष्ट करून शासनाला या निर्णयाविरोधात तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. आय.एम.ए महाराष्ट्र राज्याने यापुढील आंदोलनात्मक कृती जाहीर केली आहे, त्यामध्ये मंगळवार, दिनांक ८ जुलै रोजी राज्यभर उप जिल्हाधिकारी महोदयांना निवेदन देणे, ११ जुलै रोजी २४ तासांची एकदिवसीय आरोग्य सेवा बंद, १९ जुलै रोजी 'चलो मुंबई' भव्य रॅली असे स्वरूप राहणार आहे. यावेळी बोलतांना महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी सरकारने हा तुघलकी निर्णय घेऊन जनतेच्या आरोग्याशी खेळत आहे. सहा वर्षांचा कोर्स जर एका वर्षात पूर्ण होत असेल तर मग एमबीबीएस विद्यार्थ्यांचे पाच वर्षे का वाया घालवित आहेत. सुरक्षित आरोग्य हा जनतेचा मूलभूत अधिकार आहे. आणि तो त्यांना मिळालाच पाहिजे. परंतु, या निर्णयाने या अधिकाराला इजा पोचत आहे. तसेच हे प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याने सरकारने लगोलग गडबड करीत ही अधिसूचना काढून न्यायालयचा ही मोठा अवमान केला आहे, यावर संघटना कायदेशीर कारवाई करणार आहे. अस्तित्वात असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयांचा दर्जा वाढवून, सुविधा उपलब्ध करून देऊन, तिथे रिकामी पदे भरून वैद्यकीय जागा वाढविण्याऐवजी सरकार नको ते उद्योग करत डॉक्टर्स कमी आहेत या दुखण्यावर अघोरी उपचार करीत आहे. असे स्पष्टपणे डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले. यावेळी बोलताना डॉ नवनाथ घुगे यांनी आहे. की, जर शासनाने सदर अधिसूचना तात्काळ मागे घेतली नाही, तर लोकशाही मार्गाने संपूर्ण राज्यभर आंदोलन छेडले जाईल. तसेच हा अन्यायावर कायदेशीर मार्गाने दाद मागणार आहोत. एका वर्षाच्या कोर्स द्वारे जर असे ज्ञान आकलन होत असेल तर मग सहा वर्षांचा कोर्स सरकारने का ठेवला..? असा सवाल डॉ.घुगे यांनी केला.

# बालमटाकळीत गावच्या मध्यवस्तीत धाडसीचोरी ; चार लाखांचा ऐवज लंपास, नागरीकात भितीचे वातावरण...!

## वृद्ध दांपत्याला मारहाण करत चार लाखांच्या सोन्या-चांदीच्या दागिन्यावर चोरट्यांचा डल्ला...!

अहिल्यानगर/प्रशांत बाफना

शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथे मंगळवार दि. ८ रोजी गावच्या मध्यवस्तीत मध्यरात्री दहा ते बारा अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून गावच्या पेठेत राहणाऱ्या हिरालाल धोंडलकर यांच्या घरा शेजारील पडक्या जागेतून चोरट्यांनी घरात प्रवेश करून घरातील कपाटातील तसेच इतर सामानाची उचकापाचक करून हिरालाल धोंडलकर वय ७५ वर्षे यांना मारहाण करून त्यांच्या पत्नी अरुणाबाई धोंडलकर वय ७० वर्षे यांना देखील चोरट्याने लोखंडी गजाने मारहाण करत त्यांच्या अंगावरील अंदाजे चार लाख रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने बळजबरीने ओरबडल्याने कानाला मोठी जखम झाली होती. तसेच शेजारील पांडुरंग पाथरकर यांच्या स्टेशनरी दुकानाचे कुलूप तोडून चोरट्यांनी दुकानातील गल्ल्यामधील तीन हजाराच्या आसपास रोख रक्कम, पंधरा हजार रुपये किमतीचे बेंन्टेक्सचे दागिने तसेच वीस हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने घेऊन चोरटे पसार झाले आहे. सदर घटनेची




माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील, पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलिस उपनिरीक्षक रामहरी खेडकर, पोलीस उपनिरीक्षक प्रवीण महाले, पोलीस उपनिरीक्षक बाजीराव सानप, गुप्तवार्ता विभागाचे भगवान सानप, पोलीस कॉन्स्टेबल एकनाथ गरकळ आदींनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेची पाहणी करून पंचनामा केला. दरम्यान घटनास्थळी ठसे तज्ञांना तसेच श्वान पथक देखील पाचारण करण्यात आले होते. मात्र सीमा या श्वानाने घटनास्थळी कुठलाच माघ दाखवला नसल्याने बालमटाकळी सह परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. यावेळी गावचे सरपंच डॉ. राम बामदळे, भारतीय जनता पार्टीचे नेते तुषारभाऊ वैद्य, शेवगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रामनाथ राजपुरे, बालमटाकळी सेवा संस्थेचे माजी चेअरमन हरिश्चंद्र घाडगे, सेवा संस्थेचे माजी चेअरमन प्रशांत देशमुख, अल्पसंख्याक आघाडीचे अध्यक्ष कमूभाई शेख आदींनी सदर घटनेचा तपास जलद गतीने करण्याची मागणी केली आहे.

# आईकडून वारीचा आणि वडीलांचा ज्ञानेश्वरीचा वसा घेतलेला वारकरी पत्रकार !

## आळंदी ते पंढरपुर पालखी सोहळ्यातील दोन तपाची पुर्ती !

शिरूर कासार/प्रशांत बाफना : येथील रहिवासी तथा लोकमतचे तालुका प्रतिनिधी विजयकुमार गाडेकर यांनी आईकडून पालखी सोहळ्याचा वसा आणि लडील रामचंद्र गाडेकर यांचेकडून ग्रंथराज ज्ञानेश्वरीचा वारसा घेत आळंदी पंढरपुर पालखी सोहळ्यात दोन तपाची पुर्ती केली .

आईवडीलांच्या ईस्टेटीवर हक्क सांगणारे बहुधा सर्वत्र दिसून येतात मात्र अध्यात्मिक वारसा आणि वसा सांभाळणारे किंवा त्याचेवर हक्क सांगणारे तुरळक दिसून येतात ,शिरूर कासार येथील पत्रकार म्हणून कार्यरत असलेले गाडेकर यांनी आईच्या पश्चात वारीचा उपक्रम गेली २४ वर्ष अव्याहतपणे सुरू ठेवला त्याचबरोबर आपल्या वडीलांचा ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण हा वसा तर सांभाळलाच शिवाय ज्ञानेश्वरी प्रवचन



सेवा निःशुल्क पणे करतात .वारकरी वेशभुशेत हाती टाळ घेऊन ते गेली २४ वर्षापासुन आळंदी येथून दिंडी क्रमांक १२५ संत महादेव महाराज या दिंडीत सहभागी होतात ,अभंग गवळणी ,भारूड असे भजन गात गात पंढरीकडे वाटचाल करत असतांना विसरूनी आपुला देहपण भाव या प्रमाणे घर ,शेती आणि आप्तेष्ट यांचेपासुन तब्बल वीस बावीस दिवस ते अध्यात्मिक विश्वात रंगुन जातात .

माऊलीच्या पालखी सोहळ्यात सहभागी झाल्यानंतर जी उर्जा मिळते ती ऊन वारा पाऊस अशा अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत एक वेगळा आनंद मिळतो असे गाडेकर सांगतात .घरात सुरू झालेली ही वारी माऊली जोपर्यंत करून घेतील तोपर्यंत वारीत सहभागी होणार असल्याचे विजयकुमार गाडेकर यांनी सांगितले.

वारीतील आनंदाची अनुभुती सहभागी झाल्यावरच कळते ,ज्ञानोबा तुकाराम हे भजन आणि संताची अभंग गवळणी त्याशिवाय काकडा भजन ,निवडक अभंग वाराचे अभंग ,नाटाचे अभंग ,हरिपाठ असी क्रमवारीच्या भजनाने सकाळी सुरू झालेला प्रवास मुक्कामी कधी पोहचतो हे कळून येत नाही .

प्रज्ञाचक्षू मुकूंद काकाचा सहवास ! वारीच्या वाटेवर सायंकाळी पुण्यापासून थेट वाखरी पर्यंत प्रवास करून आल्यानंतर प्रज्ञाचक्षू मुकूंदकाका यांचे प्रवचन वेगळी उर्जा देऊन जाते .

व्यसन मुक्तिचा संकल्प !

दोन तपाच्या वारीची पुर्ती आणि ह.भ.प.गोविंद शास्त्री जाटदेवळेकर यांच्या संकल्पनेतून व्यसनमुक्ती अभियानाची विशेष अनुभुती मिळाली .

# राज्यातील ८५ वीज कामगार,अभियंते,अधिकारी व कंत्राटी कामगार वीज कंपन्यांचे खाजगीकरण करण्याचे केंद्र व राज्य सरकारचे धोरणाच्या विरोधात संपावर

बीड (प्रतिनिधि)

महाराष्ट्र राज्य वीज कामगार,अभियंते, अधिकारी संयुक्त कृती समितीच्या नेतृत्वाखाली दिनांक ९ जुलै २०२५ रोजी राज्यातील ८६,००० वीज कामगार,अभियंते,अधिकारी व कंत्राटी कामगार यांनी संपावर जाण्याचा निर्णय घेतलेला आहे.दि.४ जानेवारी २०२३ रोजी वीज कामगार संघटनांनी एकत्र येऊन महाराष्ट्र मध्ये समांतर वीज वितरणाचा परवाना महावितरण कंपनीच्या कार्यक्षेत्रात अदानी व इतर खाजगी भांडवलदारांना देऊ नये या मागणी करता संप पुकारला होता.संपाच्या पार्श्वभूमीवर कामगार संघटनांच्या नेत्या समवेत सह्याद्री अतिथी गृहामध्ये चर्चा करताना महाराष्ट्र सरकारचे तत्कालीन ऊर्जा व उपमुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांनी ४ जानेवारी २०२३ रोजी राज्य सरकारच्या मालकीच्या सरकारी तिन्ही वीज कंपन्या कोणत्याही प्रकारचे खाजगीकरण करणार नाही. उलट त्यांना आर्थिक मदत करून सक्षम करू असे कामगार संघटना नेत्याबरोबर पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले होते. मा.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी खाजगीकरण करणार नाही हा कामगार संघटनांना दिलेला शब्द फिरवत वीज कंपन्यामध्ये खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू केल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली असून विज कर्मचाऱ्यांनी संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे.

देशभरातील सार्वजनिक विविध कंपन्यांचे खाजगीकरण केंद्र व विविध राज्य सरकारने करत असल्यामुळे ९ जुलैला देशातील २७ लाख वीज कर्मचाऱ्यांनी नॅशनल कोआर्डिनेशन कमिटी एम्प्लॉईज अँड इंजिनियरच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारच्या खाजगीकरणाच्या धोरणाच्या विरोधात संपावर जात आहे.म्हणून त्याच दिवशी महाराष्ट्रातील वीज कर्मचाऱ्यांनी सुद्धा संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र सरकारच्या महावितरण कंपनीच्या कार्यक्षेत्रामध्ये अनेक खाजगी भांडवलदाराने डिस्ट्रीब्यूशन लायसन्स मागितलेली आहे.याबाबतची सुनावणी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाकडे २२ जुलैला होणार आहे.तसेच महावितरण कंपनीने २२९ उपकेंद्रे निविदा काढून खाजगी ठेकेदारांना चालविण्यास देण्याची प्रक्रिया सुरू केलेली आहे. महापारेषण कंपनीत २०० कोटीच्या वरील सर्व कंत्राटे खाजगी भांडवलदारांना देण्याकरिता प्रक्रिया सुरू केली आहे.पारेषण कंपनीने मार्केटमध्ये शेअरलिस्टिंग करावे असे राज्य सरकारने निर्देश दिलेले आहे.निर्मिती कंपनीचे जलविद्युत केंद्र खाजगी भांडवलदारांना देण्याचा घाट राज्य सरकारने घातलेला आहे.वीज ग्राहकाच्या समंती शिवाय राज्यभर २ कोटी २५ लाख ६५ हजार स्मार्ट प्रीपेड मीटर लावण्याची प्रक्रिया खाजगी भांडवलांना दिलेले असून दहा वर्ष देखभाल दुरुस्ती खाजगी



भांडवलदाराकडे राहणार आहे.वरील सर्व घटनाक्रम हा खाजगीकरणाचा असून याला तीव्र विरोध कृती समिती मध्ये सहभागी संघटनांनी केलेला आहे.

निर्मिती,पारेषण व वितरण या तिन्ही वीज कंपन्यांमध्ये ४० हजाराच्या वर स्थायी पदे रिक्त आहेत. ही सर्व रिक्त पदे भरावी व ही रिक्त पदे भरती करताना कंत्राटी कामगारांना प्रथम सामावून घ्यावे अशी आग्रही मागणी कामगार संघटनांची आहे. कंत्राटी कामगाराचे आर्थिक व सामाजिक शोषण सरकारी वीज कंपन्याकडून करण्यात येत आहे ते बंद करावे ही मागणी प्रामुख्याने करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ व आताच्या निर्मिती,पारेषण व वितरण विज कंपन्या मधील कामगार,अभियंते व अधिकारी यांना कोणतीही पेन्शन नाही.वीज कर्मचाऱ्यांना पेन्शन लागू करावी ही मागणी प्रामुख्याने कृती समितीने केलेली आहे. पगारवाढ करार करारानंतर प्रलंबित असलेल्या प्रश्नावर अनामली कमिटी गठीत करून तात्काळ चर्चा सुरू करून कारवाई करावी ही मागणी कृती समितीने केलेली आहे. कृती समितीने एकूण १४ मागण्या करीता हा संप पुकारलेला आहे. त्या संपामध्ये राज्यातील ८६००० कर्मचारी,अभियंते अधिकारी व ४२००० कंत्राटी कामगार सहभागी होणार आहेत असे कृती समितीच्या वतीने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.



# कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बीड यांची भेट 'आप 'ने दिला आंदोलनाचा इशारा

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील नागरिक गेल्या आठ वर्षांपासून अमृत अटल पाणीपुरवठा योजनेच्या पूर्णतेची प्रतीक्षा करत असूनही, आजतागायत योजनेचा लाभ त्यांना मिळालेला नाही. याच पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टीच्या शिष्टमंडळाने १३ जून रोजी निवेदन देऊन सुद्धा कुठलीही कार्यवाही न झाल्याने, पक्षाच्या वतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या छत्रपती संभाजीनगर येथील मुख्य अभियंता मनीषा पलांडे व अधीक्षक अभियंता दीपक कोळी यांची भेट घेऊन पुन्हा निवेदन सादर करण्यात आले होते. याच निवेदनाचा पाठपुरावा म्हणून आज बीड येथील मा.हेमंत नागदे साहेब कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बीड भेट घेऊन निवेदन देण्यात आले

या निवेदनात बीड शहरातील नागरिकांना वेळेवर व योग्य प्रमाणात पाणी न मिळाल्याबाबत संताप व्यक्त करण्यात आला. माजलगाव धरण भरलेले असूनही बीडकरांना पाणी मिळत नसल्यामुळे उशाला पाणी, गळ्याला कोरड अशी अवस्था निर्माण झाली आहे. यासाठी नगरपरिषद प्रशासन, गुत्तेदार व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची हलगर्जी व भ्रष्ट कारभार जबाबदार असल्याचा आरोप आम आदमी पार्टीने केला आहे.

११४ कोटींची अमृत योजना अपूर्ण असतानाही, १०० कोटींचे बील गुत्तेदारांना अदा करून ते पसार झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. काम अपूर्ण असतानाही बील दिल्यामुळे लाखो नागरिकांना अजूनही स्वच्छ पाणी मिळालेले नाही. नगरपरिषद अधिकारी म्हणतात, पाणी बीडला कधीच मिळणार नाही, ही उदासीनता धक्कादायक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

पक्षाच्या वतीने बीड शहरातील अपूर्ण राहिलेल्या कामांची यादीही सादर करण्यात आली असून, जर सहा दिवसांच्या आत यावर कारवाई झाली नाही, तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन छेडले जाईल तसेच जनहित याचिका हायकोर्टात दाखल केली जाईल, असा इशारा पक्षाने दिला आहे.या प्रसंगी आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे व शहराध्यक्ष सय्यद सादिक रफिक पठाण अल्पसंख्याक विभाग प्रमुख इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना हस्ताक्षराची गोडी लावणारे आदर्श शिक्षक - अनिल बेद्रे

आष्टी (प्रतिनिधी)

आजच्या डिजिटल युगात जरी आपण कीबोर्डवर टायपिंग अधिक करत असलो, तरी एक काळ असा होता की चांगल्या हस्ताक्षरासाठी शिक्षकांकडून आणि पालकांकडून आपल्याला फटकारणं सहन करावे लागायचे. मात्र काहींचे हस्ताक्षर इतके देखणे असते की ते एखाद्या संगणकीय प्रिंटसारखे वाटते. असेच एक नाव सध्या प्रसिद्ध झाले आहे ते म्हणजे आदर्श शिक्षक अनिल बेद्रे. आष्टी तालुक्यातील बावी येथील ते मुळचे रहिवासी आहेत.



अनिल बेद्रे यांचे हस्ताक्षर हे सर्वात सुंदर हस्ताक्षर असल्याचे म्हटले जाते. लोकांनी त्यांच्या हस्ताक्षराचे भरभरून कौतुक केलेले आहे. काही जणांना तर हे खरे वाटले नाही की हे हस्ताक्षर आहे, त्यांना वाटले हे एखादे डिजिटल टायपोग्राफीचं उदाहरण असावं. अनिल बेद्रे यांचे हस्ताक्षर इतके शुद्ध, नीटनेटके आणि सुंदर आहे की ते पाहून कोणालाही वाटेल की ते प्रिंटरने छापलेले आहे. बेदाग वळणे, अचूक आणि आकर्षक शैली यामुळे त्यांचे हस्ताक्षर एक कलाकृती वाटते.

या असामान्य कौशल्यामुळे अनिल बेद्रे यांना अनेक सन्मान प्राप्त झाले असून अनेकांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. अनिल बेद्रे यांचे हस्ताक्षर हे केवळ त्यांच्यापुरतेच मर्यादित न राहता, शिक्षकांना, विद्यार्थ्यांना तसेच सर्व लोकांना प्रेरणा देत आहे. आजही सोशल मीडियावर त्यांच्या हस्ताक्षराचे फोटो आणि व्हिडीओ मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. कोरोना काळात शाळा बंद होत्या तरीही विनामुल्य हस्ताक्षरांच्या कार्यशाळा त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन सुरू होत्या. आष्टी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भवरवाडी, ता. आष्टी, जि. बीड येथे ते कार्यरत असून त्यांच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे हस्ताक्षरही मोत्यासारखे आहे म्हणूनच मोत्यासारख्या अक्षरांचे लेण ठरतेय भवरवाडीची शाळा. याच कारणास्तव आ. सुरेश आण्णा धस यांनीही भवरवाडी शाळेला भेट देवून त्यांचे विशेष कौतुकही केलेले आहे. सुंदर हस्ताक्षर मार्गदर्शक अनिल बेद्रे यांनी विद्यार्थ्यांना स्ट्रोक अनुसार लेखन कसे करावे, अक्षराचे वळण कसे काढावे, अक्षराची उंची किती असावी, दोन शब्दांतील अंतर, लेखनाच्या अचूक पद्धती कोणत्या तसेच मराठी देवनागरी व कॅलिग्राफी याबाबत सखोल मार्गदर्शन करतात अशा या हस्ताक्षर तज्ञ शिक्षकाला वाढदिवसानिमित्त दै. समर्थ राजयोग परिवाराकडून हार्दिक शुभेच्छा.

# सरकारच्या विरोधात परभणी जिल्ह्यात १००% शाळा बंद

## टप्पा अनुदानासाठी उद्या दि.९ रोजीही शाळा बंद

परभणी (प्रतिनिधी)

महाराष्ट्रातील सुमारे ६५ हजार शिक्षक शिक्षण तर कर्मचारी टप्पा अनुदान पासून गेल्या तीन वर्षापासून वंचित आहेत या निषेधार्थ दि. १६ जून पासून आझाद मैदानावर शेकडो शिक्षक उपोषणाला बसलेली आहेत. तात्काळ टप्पा अनुदान जाहीर करण्यासाठी शिक्षक समन्वय संघाच्या वतीने दि. ८ व ९ जुलै रोजी शाळा बंद आंदोलन करून सरकारचे लक्ष वेधनासाठी परभणी जिल्ह्यातील शहरी भागातील शंभर टक्के शाळा बंद ठेवून टप्पा अनुदानित शिक्षक समन्वय संघाला जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटना समितीने शाळा बंद ठेवून पाठिंबा दिला.

दि. १ जुलै रोजी शिक्षक समन्वय संघाच्या वतीने सरकारला निवेदन करण्यात आले होते. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेला शासन निर्णय त्यानुसार टप्पा अनुदान देण्यासाठी आर्थिक तरतूद करून टप्पा अनुदान द्यायला पाहिजे होते परंतु सरकारने शासन निर्णय काढून त्या निर्णयाला केराची टोपली दाखवत शाळेंना आणि शिक्षकांना टप्पा वाढ अनुदानापासून वंचित ठेवले त्यासाठी महाराष्ट्रातील सर्व संघटनांचा एकजूट होऊन दिनांक आठ व नऊ रोजी शाळा बंद ठेवून टप्पा अनुदान पात्र शाळा, शिक्षकांना पाठिंबा दिला. शाळा बंद आंदोलन यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक संघटना समन्वय समिती गठीत केली त्यामध्ये शिक्षण संस्थाचालक महामंडळ, शिक्षक सेना, मुख्याध्यापक संघ, राष्ट्रवादी शिक्षक संघटना, मराठवाडा शिक्षक संघ आधी संघटनेने सक्रिय सहभाग घेतला परभणी जिल्ह्यात सर्व शिक्षक संघटना समन्वय समितीचे निमंत्रक शिक्षक सेनेचे विभागीय कार्याध्यक्ष बाळासाहेब राखे, शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष दिगंबर मोरे गुलाब हरकळ, महानगराध्यक्ष प्राचार्य प्रकाश हरगावकर, तालुका अध्यक्ष प्रा जयशंकर राखुंडे, राष्ट्रवादी शिक्षक संघटनेचे केशव अण्णा दुधाटे जिल्हाध्यक्ष पी आर जाधव, तसेच मराठवाडा शिक्षक संघाचे मकरंद, मुख्याध्यापक संघाचे देविदास उमाटे बालासाहेब भांगे, गोविंद चोरघडे, शेख शरीफ आणि टप्पा अनुदानित शिक्षक समन्वय संघाचे सर्व शिक्षक पदाधिकारी आदींनी परिश्रम घेतले

# स्वामी विवेकानंद शाळेच्या विद्यार्थ्यांनी अनुभवली ग्रह ताऱ्यांची रंगतदार सफर

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर शाळेतील इयत्ता सहावी व सातवीतील विद्यार्थ्यांनी योगेश्वरी शिक्षण संस्था अंतर्गत तारांगण केंद्रास भेट दिली. विद्यार्थ्यांच्या पंचकोश विकसनातील टप्पे दिले आहेत ज्ञानमय कोश, आनंदमय कोश, मनोमय कोश, विज्ञानमय कोश, प्राणमय कोश या पंचकोशापैकी विज्ञानमय कोशाच्या विकासनासाठी ही क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली होती. विज्ञान ही पुस्तकातून शिकण्याची गोष्ट नव्हे तर प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची गोष्ट आहे. अशाच अनुभवासाठी शाळेतर्फे विविध क्षेत्रभेटी आयोजित केल्या जातात. आपल्या विश्वाची निर्मिती कशी झाली? आपल्या पृथ्वीवरील सजीवसृष्टीची उत्पत्ती कशी झाली ? असे प्रश्न नेहमीच आपल्याला पडत




असतात. शालेय विद्यार्थ्यांना या प्रश्नांची योग्य उत्तरे मिळावीत तसेच विज्ञान विषयातील अनेक गोष्टींबद्दल रस निर्माण व्हावा या उद्देशाने नवक्षितीज बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. संतोष कुलकर्णी व संस्थेच्या सचिव तथा शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. स्वरुपाताई डिग्रसकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली होती.

या वेळी इयत्ता सहावी व सातवीतील विद्यार्थ्यांशी संवाद साधत तारांगणचे संचालक श्री. हेमंत धानोरकर यांनी मुलांना विश्वाच्या निर्मिती बाबत तसेच आकाश निरीक्षणाबद्दल माहिती दिली. मराठवाड्यात विज्ञान विषयाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी योगेश्वरी शिक्षण संस्था कटिबद्ध आहे असे मत यावेळी धानोरकर सरांनी व्यक्त केले. तारांगणाचा हा माहितीपट पाहिल्यानंतर सर्व मुले आनंदून गेले होते. एक आगळावेगळा अनुभव यावेळी विद्यार्थ्यांना अनुभवता आला.

या क्षेत्रभेटीचे यशस्वी आयोजन स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर शाळेच्या श्री. उल्हास दादा रामदासी, कु. प्रज्ञाताई देवगावकर व श्री. अंकुशदादा गायकवाड व सर्व शिक्षकवृंद यांनी केले. वाहतूक व्यवस्था रफी दादा व सचिन दादा यांनी जबाबदारीने पार पाडली.



## शहरातील कृषी विभागात जागेत तहसील कार्यालय होणार! आ. जितेश अंतापुरकरांच्या पुढाकाराला यश

देगलूर (प्रतिनिधी)

देगलूर,शहरातील नागरीकांसाठी एक सकारात्मक आणि दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. तहसील कार्यालयासाठी आता शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी – नांदेड–हैदराबाद महामार्गालगत असलेल्या कृषी कार्यालयाच्या पाच एकर रिकामी जागेची निवड करण्यात आली आहे.आ. जितेश अंतापूरकर यांनीच ही जागा प्रस्तावित केली होती. पिंपळगाव येथील जागेऐवजी शहरातच कार्यालय असावे, असा स्पष्ट आग्रह त्यांनी प्रशासनासमोर ठेवला होता. त्यांच्या पुढाकारामुळे आणि स्पष्ट भूमिकेमुळे संबंधित जागेचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आला आहे.पिंपळगाव येथील जागा शहरापासून चार किलोमीटर अंतरावर असून, ती तेलंगणा सीमेपासून अगदी जवळ आहे. त्यामुळे नागरिकांना दैनंदिन कामांसाठी फार दूर प्रवास करावा लागला असता. शिवाय प्रशासकीय सोयींच्या दृष्टीनेही ती जागा उपयुक्त नव्हती.शहराच्या मध्यवर्ती भागातच तहसील कार्यालय उभारल्यास नागरिकांचा वेळ, पैसा आणि ऊर्जा वाचणार आहे. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली मागणी पूर्णत्वास जाणार असून, देगलूरच्या प्रशासनिक विकासाच्या दिशेने ही एक महत्त्वाची पायरी मानली जात आहे.




## अंबाजोगाईत 'त्या' विहिरीसाठी 'भीक माँगो' आंदोलन : असंख्य कार्यकर्ते सहभागी,

अंबाजोगाई (त भा वृत्तसेवा)

अंबाजोगाई शहरातील बँक ऑफ महाराष्ट्र लगत असलेली निजाम कालीन विहीर बुजवून त्या ठिकाणी देण्यात आलेल्या अनाधिकृत दुकानांचे अतिक्रमण काढुन पुर्वीच्या निजामकालीन विहीरीचे पुनर्जिवीत करण्यासाठी व अतिक्रमण करण्याऱ्यास प्रोत्साहन देणाऱ्या अंबाजोगाई नगर परिषदेचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वतीने आज दिनांक ८ जुलै रोजी 'भीक माँगो' आंदोलन करण्यात आले. हे 'भीक माँगो' आंदोलन बँक ऑफ महाराष्ट्र पासून सुरु करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज चौक, मंडी बाजार, बसस्थानक परिसर आणि नगरपरिषद परिसरात हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाठी नागरिकांनी भरभरुन प्रतिसाद दिला. आंदोलनात माजी आमदार पृथ्वीराज साठे, तालुकाध्यक्ष अमर देशमुख, 'भीमशक्ती' चे भिमराव सरवदे, लोकजनशक्ती पार्टीचे राजेश वाहुळे, ड. इस्माईल गवळी, हमीद चौधरी यांच्यासह असंख्य कार्यकर्ते सहभागी झाले होते.दरम्यान, 'भीक माँगो' आंदोलनात जमा झालेले पैसे नगरपरिषदेकडे सुपुर्द करण्यात येणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## येवती (लघु आळंदी) मठ संस्थान मध्ये गुरुपौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रम

मुखेड /प्रतिनिधी

येवती ता. मुखेड येथील श्री.श्री.प.पु.सद्रगुरु नराशाम महाराज मठ संस्थान (लघु आंळदी) येथे गुरुवारी दि १०जुलै २०२५रोजी गुरुपौर्णिमे निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.श्री श्री सद्रगुरु नराशाम महाराज यांच्या उपस्थितीत हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे .या दिवशी गुरुमंत्राचा (गुरु उपदेशाचा) कार्यक्रम आहे.भाविक भक्तासाठी २.वा महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.या सोहळ्यात भाविकांनी सहभागा घ्यावा. असे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.



## ग्रामीण आरोग्य यंत्रणेला दिलासा : मुखेड तालुक्यासाठी ५९ नव्या आशा वर्कर पदांना मंजुरी

### आ. डॉ. तुषार राठोड यांच्या पाठपुराव्याचे फलित

मुखेड /प्रतिनिधी

मुखेड तालुक्याच्या ग्रामीण आरोग्य सेवेसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या अंतर्गत तालुक्यातील ५९ नव्या आशा स्वयंसेविका पदांना मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम होणार असून, सेवांमध्ये सुधारणा अपेक्षित आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या तुलनेत अपुरी आशा वर्कर पदे असल्याचे निदर्शनास आल्यावर आमदार डॉ. तुषार राठोड यांनी राज्याचे आरोग्य मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांची भेट घेऊन यासंदर्भात लेखी मागणी सादर केली होती. त्यांच्या पाठपुराव्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.



राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे सहसंचालक डॉ. संजीव कुमार जाधव यांनी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना तालुका निहाय पदवाटप करून तात्काळ भरती प्रक्रिया राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत. सध्या तालुक्यात १४९ आशा वर्कर कार्यरत आहेत, मात्र १६ महसुली गावांमध्ये अजूनही एकही वर्कर नाही, ही बाब गांभीर्याने घेतली गेली आहे.या निर्णयाची माहिती मिळताच आशा वर्कर संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार जनसंपर्क कार्यालयात भेट देऊन आमदार डॉ. तुषार राठोड यांचा सन्मान केला.या वेळी बाजार समितीचे माजी सभापती खुशालराव पाटील उमरदरीकर, लक्ष्मण पाटील खैरेकेकर, व्यंकटराव लोहबंदे, भाजपा मंडळाध्यक्ष बालाजी पाटील सकनूरकर आदी मान्यवर उपस्थित होते.ग्रामीण आरोग्य सेवा सक्षम करण्याच्या दिशेने हा एक निर्णायक टप्पा मानला जात आहे.

## सुरेश धस यांच्या मुलाच्या कारची धडक, दुचाकीस्वाराचा मृत्यू, सागर धसांवर गुन्हा दाखल!

अहमदनगर : आष्टी मतदारसंघाचे भाजपचे आमदार सुरेश धस यांच्या मुलानं (डीशीह ऊहरी डेप) सोमवारी कार चालवताना एका दुचाकीस्वाराला धडक दिली, यामध्ये दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली. नितीन शेळके असं मृत व्यक्तीचं नाव आहे. सुपा पोलिस स्टेशनमध्ये या प्रकरणी अपघाताचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

आमदार धस यांचा मुलगा सागर धस बुधवारी रात्री साडे दहाच्या




सुमाराला अहिल्यानगर-पुणे महामार्गावरून प्रवास करत होता. दुचाकीस्वार जातेगाव फाट्याकडून येत असताना सागरच्या कारनं त्याला जोरदार धडक दिली. याप्रकरणी अपघाताचा गुन्हा दाखल झाला आहे.

सागर धस हा आष्टी मतदारसंघाचे भाजपचे आमदार सुरेश धस यांचा मुलगा आहे. विधानसभा निवडणुकीदरम्यान सागर धस याने वडिलांसाठी राजकारणात सक्रिय सहभाग घेतला आणि प्रचाराची धुरा सांभाळली. सागर धसचे शिक्षण पुण्यात झालं आहे. सागर हा आष्टी मतदारसंघात युवा नेता म्हणून ओळखला जातो. मतदारसंघात सुरेश धस यांच्या अनुपस्थितीत विविध सामाजिक कार्यक्रमात सागर धस याचा सक्रिय सहभागा पाहायला मिळतो.

## मुखेडच्या नागेंद्र मंदिरात १३ जुलै रोजी प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळा

### सद्गुरू नराशाम महाराज व गुरुवर्य डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज यांचे हस्ते धार्मिक विधी

मुखेड प्रतिनिधी

मुखेड : शहरातील जुने पोलीस स्टेशनजवळील श्री नागेंद्र मंदिरात मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळा दि. १३ जुलै २०२५ रोजी उत्साहात संपन्न होणार आहे. या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, नागेंद्र मंदिर, मुखेड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे सद्गुरु नराशाम महाराज येवतीकर (नराशाम महाराज मठसंस्थान, येवती) व गुरुवर्य डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज (गणाचार्य मठसंस्थान, मुखेड) यांच्या शुभ हस्ते प्राणप्रतिष्ठा आणि कलशारोहन विधी पार पडणार आहे.कार्यक्रमास मुखेड-कंधारचे आमदार डॉ. तुषार गोविंदराव राठोड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यानंतर दुपारी १ वाजता महाप्रसाद वाटपाचे आयोजन करण्यात आले आहे.या दिवशी शहरासह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## खंदारे गुरुजींची गुरुवचने





डॉ संगिता पिंगळे
बीड

प्रभू दिसला पाहिजे, कळून उपयोग नाही असे गुरुजी म्हणाले.

प्रभू दिसला पाहिजे, कळून उपयोग नाही असे गुरुजी म्हणाले. इथे दिसण्याचा अर्थ सगुण रुपात देव दिसणे असा नसून जसा गुरुजींकडे पाहिल्यावर देव असाच गुरुजीं सारखा प्रेमळ, स्वस्थ ,शांत, आनंद सागर, ऊर्जेचा महास्त्रोत ,पराकोटीचा करुणामयी असणार याची खात्री होते तसा आपल्या आचरणातून प्रभू दिसला पाहिजे.आणि आपला प्रभू म्हणजे आपले गुरुजी दिसले पाहिजेत. गुरुजी किती महान आहेत, संत आहेत, प्रभूचे सगुण रूप आहेत हे नुसते कळून उपयोग नाही तर त्यांचे अनुसरण करत तंतोतंत पण सहज तसे जगता आले की प्रभू दिसतो. थँक्स गुरुजी, फारच मोठी संधी दिली तुम्ही. आपला नित्य जयजयकार असो.

## प्रमोदजी महाजन सेमी इंग्लिश स्कूलचा भव्य शुभारंभ

### गुणवत्तापूर्ण शिक्षणासह विद्यार्थ्यांना मिळणार उज्वल भविष्याची नवी दिशा



अंबाजोगाई । प्रतिनिधी

दिनांक ७ जुलै २०२५ रोजी गौतमेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठानच्या पुढाकाराने सुरू झालेल्या प्रमोदजी महाजन मराठी/सेमी इंग्लिश स्कूलचा उद्घाटन समारंभ शाळेचे अध्यक्ष आणि राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त सुभाषराव यशवंतराव कुलकर्णी यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या शाळेच्या माध्यमातून शहरी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी मिळणार आहे.

पालकांच्या अनेक वर्षांच्या अपेक्षांना प्रतिसाद देत, मातृभाषेतून दर्जेदार शिक्षण देणारी ही शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वचनबद्ध आहे. मर्यादित विद्यार्थ्यांची संख्या ठेवून प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष केंद्रित केले जाणार आहे. शाळेच्या मुख्याध्यापकांनी सांगितल्याप्रमाणे, शालेय शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना छएएढ, गएए यांसारख्या स्पर्धा परीक्षांची मूळ तयारी शाळेतच करून दिली जाणार आहे. त्यामुळे बाहेर शिकवणीची गरज भासणार नाही.ही शाळा केवळ पुस्तकापुरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच सांस्कृतिक, कलात्मक, भावनिक, मानसिक आणि शारीरिक विकासालाही समान महत्त्व देणार आहे. आधुनिक शिक्षणपद्धती, प्रेरणादायी वातावरण आणि तज्ञ शिक्षकवर्ग यामुळे ही शाळा शहरी व ग्रामीण भागातील शिक्षणाचे नवे केंद्रबिंदू ठरणार आहे.सध्या बालवाडी ते चौथी इयत्तेसाठी प्रवेश सुरू असून पालकांनी आपल्या पाल्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी आजच प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन शाळा व्यवस्थापनाने केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब यांनी निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय : दैनिक मराठवाडा दर्शन, माधव नगर, धारूर रोड, केज ता.केज जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY HANDIBAG DATTATRAY BALASAHEB AND PUBLISHED BY HANDIBAG DATTATRAY BALASAHEB ON BEHALF OF HANDIBAG DATTATRAY BALASAHEB AND PRINTED AT NIRMITEE PRINTS, KABAD GALLI, BEED TQ.DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT.THE OFFICE OF DAILY MARATHWADA DARSHAN, At.MADHAV NAGAR, DHARUR ROAD, KAIJ TQ.KAIJ, DIST.BEED ( MAHARSHTRA).
EDITOR- HANDIBAG DATTATRAY BALASAHEB